पुण्यनगरी

# विद्यापीठातर्फे हवामान बदलावर आजपासून व्याख्यानमाला

कोल्हापूर : 'हवामान बदल व शाश्वत विकास' याबाबत सर्वंकष चर्चा करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेट चेंज व सस्टेनेबिलिटी स्टडीज'तर्फे प्रथमच ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारपासून (दि. २१ सप्टेंबर) व्याख्यानमालेस प्रारंभ होत असून, ती १२ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. देश-विदेशातील अनेक नामवंत शास्त्रज्ञ याअंतर्गत व्याख्याने देतील, अशी माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी दिली आहे. डॉ. पन्हाळकर म्हणाले, डॉ. अनिल कुलकर्णी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगलोर यांच्या व्याख्यानाने उद्या सायंकाळी ५ वाजता व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. 'तापमान वाढ व जलस्रोतांवर होणारा परिणाम' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानमालेत पुढे माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे (दि. २५ सप्टेंबर) यांचे 'धरणे, महापूर आणि हवामान बदल' या विषयावर, डॉ. व्यंकटेश मेरवाडे, पर्ड्यू विद्यापीठ, अमेरिका (दि. २८ सप्टेंबर) यांचे 'अमेरिकेतील महापुराचे नियोजन आणि त्या तंत्रज्ञानाचा भारतात वापर' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

# विसर्जनादिवशी वाढले ध्वनिप्रदूषण



## यंदा गणेशोत्सवात गर्दी अधिक; गतवर्षीपेक्षा आवाज मोठा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : ना मिरवणूक, ना कर्णकर्कश ध्वनियंत्रणा, ना रस्त्यावर गर्दी तरीही यंदा अनंतचतुर्दशीला गेल्या वर्षीच्या तुलनेत आवाजाच्या पातळीत वाढ झाली. गतवर्षापेक्षा अधिक लोक यंदा रस्त्यावर आल्याने ध्वनी पातळीत वाढ झाल्याचे अभ्यासकाचे मत आहे.

> **कोरोनामुळे गतवर्षी अनंतचतुर्दशीच्या दिवशी रस्त्यावर भाविक कमी होते. यंदा भाविकांची गर्दी अधिक होती. तसेच फटाके, ध्वनिक्षेपक यांचाही वापर गतवर्षीच्या तुलनेत वाढला होता. त्यामुळे २०२० पेक्षा २०२१ मध्ये ध्वनी पातळी वाढलेली दिसली.**
> – **प्रा. डॉ. आसावरी जाधव,** प्रभारी विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने हे सर्वेक्षण केले आहे.

पर्यावरणशास्त्र विभागाने रविवारी (ता. १९) शहरातील ४ क्षेत्रांतील २२ ठिकाणी ध्वनीची पातळी मोजली. संध्याकाळी ६ ते १२ या वेळात हे सर्वेक्षण केले. यातून २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये ध्वनी पातळीत वाढ झाल्याचे दिसून आले. कारण यंदा भाविकांची गर्दी अधिक होती. काही भागात ध्वनिक्षेपकही लावले होते. त्यामुळे ही पातळी वाढली आहे. प्रा. डॉ. पी. डी. राऊत, प्रा. डॉ. असावरी जाधव, डॉ. पी. आर. भोसले, सी. एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली विजय परीट, ऋतुराज पिंगळे, स्वस्तिक शिंदे, मनोज गुरव यांनी हे सर्वेक्षण केले.

अनंतचतुर्दशीच्या दिवशी शहरातील ध्वनी पातळी (आकडे डेसिबल)

| क्षेत्र | परिसराचे नाव | २०२० | २०२१ |
|---|---|---|---|
| शांतता | सीपीआर | ५५.९७ | ५६.०६ |
| | न्यायालय | ४६.५१ | ५१.०३ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ४५.६२ | ५५.०४ |
| | शिवाजी विद्यापीठ | ४१.७३ | ३९.९० |
| रहिवासी | राजारामपुरी | ३९.४७ | ४०.०१ |
| | उत्तरेश्वर पेठ | ४६.५२ | ५१.०२ |
| | शिवाजी पेठ | ४६.६५ | ४४.०९ |
| | मंगळवार पेठ | ३८.१७ | ४६.२० |
| | नागाळा पार्क | ४०.२९ | ४४.२३ |
| | ताराबाई पार्क | ४६.८७ | ४७.३० |
| व्यावसायिक | मिरजकर तिकटी | ५१.७६ | ५४.०१ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | ४४.९३ | ५७.०६ |
| | महाद्वार रोड | ५४.०५ | ५२.३० |
| | गुजरी कॉर्नर | ४३.७९ | ५२.०१ |
| | पापाची तिकटी | ५९.६४ | ६०.०२ |
| | राजारामपुरी | ५१.०२ | ५२.०३ |
| | लक्ष्मीपुरी | ४२.९३ | ५४.०८ |
| | शाहूपुरी | ४२.०५ | ५३.०२ |
| | गंगावेश | ६०.६९ | ६३.०८ |
| | बिंदू चौक | ५२.४० | ५५.१० |
| औद्योगिक | उद्यमनगर | ४५.१२ | ५६.५० |
| | वाय. पी. पोवार नगर | ४३.४५ | ५४.६० |

सकाळ



कोल्हापूर : साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल लेखिका सोनाली नवांगुळ यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. शेजारी मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे आदी.

# 'साहित्य अकादमी'बद्दल नवांगुळ यांचा सत्कार

## कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या शुभेच्छा

**कोल्हापूर, ता. २० :** साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल लेखिका सोनाली नवांगुळ यांचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे व प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आज अभिनंदन केले. नवांगुळ यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट देत संवाद साधला.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठ भविष्यात भाषांतराचा एक महत्त्वाचा प्रकल्प राबविण्याचा विचार करीत असून, या प्रकल्पात त्यांनी सहभाग द्यावा, असे आवाहन केले. नवांगुळ यांनीही विद्यापीठ आपले असल्याने या प्रकल्पात सहभागाला नाही म्हणण्याचा प्रश्नच येत नाही, असे स्पष्ट केले. तसेच, विद्यापीठातील प्रमुख वास्तू दिव्यांगांशी मैत्रीपूर्ण बनविण्याच्या प्रयत्नाबद्दल डॉ. शिर्के यांनी माहिती दिली. दरम्यान, नवांगुळ यांच्यावर राज्यभरातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनीही पुरस्काराची घोषणा होताच तमीळ लेखिका सलमा यांचे आणि मराठी वाचकांना तमीळ लेखिकेच्या साहित्यकृतीची भाषांतराच्या माध्यमातून ओळख करून दिल्याबद्दल नवांगुळ यांचे कौतुक केले आहे.

21 SEP 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परकीय भाषा शिकण्याचे धोरण हवे

## डॉ. दिलीप चव्हाण; डॉ. मेघा पानसरे संपादित 'विदेशी भाषा'चे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. २० :** परकीय भाषा शिकण्याचे धोरण शालेय स्तरापासून हवे, असे मत नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी भाषा विभागाचे डॉ. दिलीप चव्हाण यांनी व्यक्त केले. विदेशी भाषांमधील शिक्षण व करिअर संधींची साकल्याने माहिती देणारा ग्रंथ डॉ. मेघा पानसरे यांनी साकारला आहे, असेही ते म्हणाले.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी संपादित केलेल्या 'विदेशी भाषा : शिक्षण आणि करिअर' या पुस्तकाच्या ऑनलाईन प्रकाशन समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रमुख व भाषांतरकार डॉ. उज्ज्वला बर्वे यांच्या हस्ते पुस्तकाचे ऑनलाईन प्रकाशन झाले.



डॉ. चव्हाण

डॉ. चव्हाण म्हणाले, "भारताचे परकीय भाषाविषयक धोरण निश्चित नाही. इंग्रजीखेरीज आणखी एखादी परकीय भाषा शालेय स्तरापासून शिकविण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. देशात परकीय भाषांकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोन सोडून द्यायला हवा."

ते म्हणाले, "अमेरिकेत चिनी भाषा शिकण्यासाठी इच्छुकांचा वर्ग मोठा आहे. चीनमध्येही इंग्रजीबद्दल आकर्षण आहे. भारताचा विचार करता एकूण लोकसंख्येच्या केवळ पाच टक्के लोक इंग्रजी भाषा वापरण्याच्या योग्यतेचे असल्याचे संशोधन सांगते. पुणे, दिल्ली, मुंबई, हैदराबाद येथील खासगी संस्थांत परकीय भाषांचे ज्ञान दिले जात आहे. भाषेतील संस्कृती, तत्त्वज्ञान, शहाणपण एकमेकांना प्रदान करण्याची आजची गरज आहे."

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यापीठ परिक्षेत्रात विदेशी भाषांच्या शैक्षणिक प्रसारामध्ये विदेशी भाषा विभागाने गेल्या ५० वर्षांत मोठे योगदान दिलेले आहे. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांपर्यंत विदेशी भाषा पोचविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी विभागाने पुढाकार घ्यावा. त्याचप्रमाणे विद्यापीठातर्फे दर्जेदार पुस्तकांच्या अनुवादाचा प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. त्यातही विदेशी भाषांच्या अनुवादकांना सामावून घ्यावे."

शीतल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. प्रियांका माळकर यांनी आभार मानले.

21 SEP 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलाबाबत आजपासून व्याख्यानमाला

## 'सेंटर फॉर क्लायमेट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडीज'चा उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हवामान बदल व शाश्वत विकास' याबाबत शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमॅट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडीज'तर्फे ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारपासून (दि. २१) व्याख्यानमालेस प्रारंभ होत असून १२ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. देश-विदेशातील अनेक नामवंत शास्त्रज्ञ व्याख्याने देणार आहेत, अशी माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी दिली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगलोरचे डॉ. अनिल कुलकर्णी यांच्या व्याख्यानाने



शिवाजी विद्यापीठातून...

मंगळवारी सायंकाळी ५ वाजता व्याख्यानमालेचे उद्घाटन होईल. 'तापमान वाढ व जलस्रोतांवर होणारा परिणाम' या विषयावर ते मार्गदर्शन करतील. व्याख्यानमालेत माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे (दि. २५) यांचे 'धरणे, महापूर आणि हवामान बदल' या विषयावर, डॉ. व्यंकटेश मेरवाडे, पर्ड्यू विद्यापीठ, अमेरिका (दि. २८) यांचे 'अमेरिकेतील महापुराचे नियोजन आणि त्या तंत्रज्ञानाचा भारतात वापर' या विषयावर, जलतज्ज्ञ डॉ. प्रदीप पुरंदरे (दि. २९) यांचे 'बदलते हवामान व महापूर व्यवस्थापन' या विषयावर, पर्यावरणतज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत (दि.१) यांचे 'हवामान बदलाच्या अनुषंगाने शैक्षणिक संस्थांची जबाबदारी' या विषयावर, डॉ. सचिन पन्हाळकर (दि. ५) यांचे 'पंचगंगेचा महापूर: कारणे व उपाय' या विषयावर व भारतीय सुदुर संवेदन संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. भास्कर निकम (दि. ९) यांचे 'हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांवरील हवामान बदलाचा परिणाम' या विषयावर व्याख्यान होईल.

व्याख्यानमालेचा समारोप शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या व्याख्यानाने होईल.

### हवामान बदलाचे शास्त्रीय अध्ययन...

हवामान बदलाचा कोल्हापूर, सातारा, सांगली व पश्चिम घाट परिक्षेत्रामध्ये होणाऱ्या परिणामांचे सखोल शास्त्रीय स्तरावर अध्ययन करण्यासाठी विद्यापीठामध्ये 'सेंटर फॉर क्लायमेट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडीज'ची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्राकडून समाजासाठी उपयुक्त योगदान निश्चितपणे लाभेल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

21 SEP 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाने ओलांडली मर्यादा

## शिवाजी विद्यापीठाचे सर्वेक्षण; सायलंट झोनमध्येही वाढले प्रदूषण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यंदाच्या गणेशोत्सवात गतवर्षीच्या तुलनेत ध्वनिप्रदूषणात वाढ झाल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या अहवालातून समोर आले आहे. अनंत चतुर्दशीला सायंकाळी ६ ते १२ या कालावधीत ध्वनिप्रदूषणात वाढ झाली. फटाक्यांची आतषबाजी, बाजारपेठांमधील वर्दळ, वाहनांचा गोंगाट यामुळे ध्वनिप्रदूषणात वाढ झाल्याचे पर्यावरण शास्त्र विभागाच्या सर्वेक्षण अहवालातून समोर आले आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शहरातील ४ क्षेत्रांमधील २२ ठिकाणांहून आवाजाचे नमुने गोळा करून सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणानुसार सायलंट झोन असलेल्या सीपीआर रुग्णालय, जिल्हा सत्र न्यायालय परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी ध्वनिप्रदूषणात वाढ झाल्याचे पहायला मिळाले. याशिवाय शहरी भागातील उत्तरेश्वर पेठ, मंगळवार पेठ, ताराबाई पार्क आणि व्यावसायिक भागातील पापाची तिकटी, गंगावेस या ठिकाणी ध्वनिप्रदूषणात वाढ झाली. हे सर्वेक्षण डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. आर. भोसले, सी. एस. भोसले, विजय परीट, ऋतुराज पिंगळे, सत्विक शिंदे, मनोज गुरव आदींच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

> गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण वाढले आहे. ट्रॅफिक वाढले, नागरिकांची वर्दळ वाढल्याचा परिणाम दिसून आला. मात्र, हे ध्वनी प्रदूषण कोरोना काळ वगळता इतर गणेशोत्सवांच्या तुलनेत कमी होते.
>
> **- डॉ. आसावरी जाधव,**
> विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र

**साऊंड सिस्टीमला फाटा तरीही प्रदूषणात वाढ**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकांवर बंदी घालण्यात आली होती. कोल्हापूरकरांनी राज्य सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद देत विधायक पद्धतीने साऊंड सिस्टीममुक्त विसर्जन मिरवणूक काढली. तरीही गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणात वाढ झाल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या अहवालातून समोर आले आहे.

**या ठिकाणी ध्वनिप्रदूषणात झाली वाढ**

(२०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये ध्वनी प्रदूषणात झालेली वाढ डेसिबलमध्ये)

| ठिकाण | २०२० | २०२१ |
|---|---|---|
| सीपीआर | ५५.९७ | ५६.०६ |
| न्यायालय | ४६.५१ | ५१.०३ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ४५.६२ | ५५.०४ |
| उत्तरेश्वर पेठ | ४६.५२ | ५१.०२ |
| मंगळवार पेठ | ३८.१७ | ४६.२० |
| ताराबाई पार्क | ४६.८७ | ४७.३० |
| पापाची तिकटी | ५९.६४ | ६०.०२ |
| गंगावेश | ६०.६१ | ६३.०८ |

पुढारी

# स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी; आजपासून व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने मंगळवारपासून (दि. २१) 'प्रिपेअरिंग फॉर कॉम्पिटिटिव्ह एक्झामिनेशन्स' या विषयावर निमंत्रितांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.



व्याख्यानमालेंतर्गत मंगळवारी सकाळी १०.४५ वाजता विकास खर्गे (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे मुख्य सचिव) यांचे 'स्पर्धा परीक्षेची तयारी' या विषयावर व्याख्यान होईल. दि. २२ रोजी सकाळी १०.४५ वाजता डॉ. नरेंद्र विस्पुते (आयआयएस) (सहायक संचालक, दूरदर्शन बातम्या विभाग, मुंबई) यांचे 'संरक्षण क्षेत्रात करिअरच्या संधी' या विषयावर व्याख्यान तर गुरुवार, २३ रोजी दुपारी २.४५ वाजता मदन नागरगोजे (आयएएस) (सचिव महाराष्ट्र सरकार) यांचे 'यूपीएससी परीक्षांची तयारी' विषयावर व्याख्यान होणार आहे. शनिवार, दि. २५ रोजी सकाळी १०.४५ वाजता चंदूलाल तहसीलदार (आयएफएस) (पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार) यांचे 'वनीकरण क्षेत्रात करिअरच्या संधी' विषयावर व्याख्यान, दि. २५ रोजी दुपारी १२.३० वाजता पवन जिंदम (आरबीआई ऑफिसर) यांचे 'आरबीआई परीक्षांची तयारी' विषयावर व्याख्यान होणार आहे.

लोकसत्ता

# हवामान बदलाबाबत आजपासून व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** 'हवामान बदल व शाश्वत विकास' याबाबत सर्वंकष चर्चा करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात उद्या मंगळवारपासून प्रथमच ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी सोमवारी दिली.

व्याख्याते याप्रमाणे ( कंसात विषय ) २१ सप्टेंबर - बेंगलोर येथील शास्त्रज्ञ डॉ. अनिल कुलकर्णी, (तापमान वाढ व जलस्त्रोतांवर होणारा परिणाम), २५ सप्टेंबर – माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे (धरणे, महापूर आणि हवामान बदल), २८ सप्टेंबर – अमेरिकेतील हवामान शास्त्रज्ञ डॉ. व्यंकटेश मेरवाडे (अमेरिकेतील महापुराचे नियोजन आणि त्या तंत्रज्ञानाचा भारतात वापर), २९ सप्टेंबर जलतज्ज्ञ डॉ. प्रदीप पुरंदरे (बदलते हवामान आणि महापूर व्यवस्थापन), १ ऑक्टोबर – पर्यावरणतज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत (हवामान बदलाच्या अनुषंगाने शैक्षणिक संस्थांची जबाबदारी) ५ ऑक्टोबर– डॉ. सचिन पन्हाळकर (पंचगंगेचा महापूर कारणे आणि उपाय). ९ ऑक्टोबर – भारतीय सुदुर संवेदन संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. भास्कर निकम (हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांवरील हवामान बदलाचा परिणाम), १२ ऑक्टोबर – डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन.जे. पवार (हवामान बदल आणि शाश्वत विकास)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 SEP 2021
लोकमत

# नवांगुळ यांनी भाषांतर प्रकल्पात सहभागी व्हावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठातर्फे सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भाषांतराच्या नव्या प्रकल्पात लेखिका सोनाली नवांगुळ यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी केले. साहित्य अकादमी पुरस्काराच्या मानकरी ठरल्याबद्दल नवांगुळ यांचा विद्यापीठातर्फे सत्कार करण्यात आला. नवांगुळ यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम झाला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे हे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ भविष्यात भाषांतराचा एक महत्त्वाचा प्रकल्प राबवणार आहे. त्यात सोनाली नवांगुळ यांनीही सहभागी व्हावे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये दिव्यांगांना सेवा-सुविधा पुरवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लेखिका नवांगुळ यांनीही इमारतीला भेट देऊन काही त्रुटी असल्यास निदर्शनास आणून द्याव्यात.

नवांगुळ यांनीही विद्यापीठ आपले असल्याने सांगून, प्रकल्पात सहभागी होण्यासंबंधी सकारात्मकता दाखवली.



कोल्हापुरातील लेखिका सोनाली नवांगुळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सोमवारी शिवाजी विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांच्याहस्ते पुष्पगुच्छ व पुस्तकभेट देऊन सत्कार करण्यात आला.

### तमिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

राज्यभरातील विविध मान्यवरांकडून नवांगुळ यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तमिळ लेखिका सलमा यांची मूळ तमिळ कादंबरीचे इंग्रजी भाषांतर झाले होते. त्याचे मराठी अनुवाद केलेल्या साहित्यकृतीस पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल लेखिका नवांगुळ यांचे तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी अभिनंदन केले.

21 SEP 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# काळसेकर स्मृतिप्रित्यर्थ ७ लाखांचा निधी

## काळसेकर कुटुंबियांकडून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे धनादेश सुपुर्द

प्रतिनिधी
कोल्हापूर

कवी सतीश काळसेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ काळसेकर कुटुंबियांकडून शिवाजी विद्याथीठाला सात लाखांचा निधी देण्यात आला. सुप्रिया काळसेकर यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे हा धनादेश सुपुर्द केला. काळसेकर यांच्या वाङ्मयीन कार्याचे स्मरण म्हणून विद्यापीठाने लक्षणीय काव्यलेखन करणाऱ्या कवीला हा पुरस्कार द्यावा, अशी अपेक्षा पुजा काळसेकर यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सतीश काळसेकर यांच्या वाङ्मयीन कार्याचे स्मरण तसेच आधुनिक मराठी साहित्यातील महत्त्वाच्या कवींचा सन्मान या निमित्ताने होणार आहे.

काळसेकर हे मराठीतील लघुनियतकालिक चळवळीतील ते बिनीचे शिलेदार होते. त्यांच्या 'वाचणाऱ्यांची रोजनिशी" ग्रंथास साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवले होते. 'ऋत्विज काळसेकर नव्या पिढीतील आश्वासक कवी होते. त्यांचा 'काळोखाच्या तळाशी" काव्यसंग्रह प्रकाशित आहे. काळसेकरांचा कोल्हापूरशी ऋणानुबंध होता. या रकमेच्या व्याजातून 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' व 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येणार आहे. ज्येष्ठ कवीस 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार" दिला जाणार आहे. ऋत्विज काळसेकर पुरस्कार नव्या पिढीतील कवीस दिला जाणार आहे. दोन्ही पुरस्कार पुढील वर्षापासून दिले जाणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आदित्य काळसेकर, विप्लव काळसेकर, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. उदय नारकर, डॉ. मेघा पानसरे, ए. टी. चौगुले आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : कवी सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे धनादेश सुपूर्द करताना सुप्रिया काळसेकर. सोबत डॉ. पी. एस. पाटील, डॉ. मेघा पानसरे, आदित्य काळसेकर, डॉ. उदय नारकर, विप्लव काळसेकर, अजित चौगुले, डॉ. रणधीर शिंदे.**

21 SEP 2021 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनंत चतुर्दशीदिवशी आवाजाची पातळी वाढली

## शहरातील स्थिती : जास्त लोक रस्त्यावर; ध्वनिक्षेपक यंत्र वापराचा परिणाम

कोल्हापूर : कोरोना महामारीमुळे गर्दी नियंत्रणात असतानाही गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा अनंत चतुर्दशीदिवशी रविवारी (दि. १९) आवाजाच्या पातळीत वाढ झाली. गतवर्षीपेक्षा जास्त लोक रस्त्यावर आल्याने आणि ध्वनिक्षेपक यंत्राचा वापर केल्याने ध्वनी पातळीत वाढ झाल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. यासंबंधीचे सर्वेक्षणही शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने केले आहे.

पर्यावरणशास्त्र विभागाने रविवारी शहरातील चार विभागांतील २२ ठिकाणी आवाजाची पातळी यंत्राव्दारे मोजली. संध्याकाळी ६ ते १२ या वेळेत ही मोजणी केली. यातून गत वर्षाच्या तुलनेत यावर्षी ध्वनी पातळीत वाढ झाल्याचे दिसून आले.

### अनंत चतुर्दशीच्या दिवशी शहरातील ध्वनी पातळी

(आकडे डेसिबल)

| क्षेत्र परिसराचे नाव | २०२० | २०२१ |
|---|---|---|
| सीपीआर | ५५.९७ | ५६.०६ |
| न्यायालय | ४६.५१ | ५१.०३ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ४५.६२ | ५५.०४ |
| शिवाजी विद्यापीठ | ४१.७३ | ३९.९० |
| रहिवासी भाग | | |
| राजारामपुरी | ३९.४७ | ४०.०१ |
| उत्तरेश्वर पेठ | ४६.५२ | ५१.०२ |
| शिवाजी पेठ | ४६.६५ | ४४.०९ |
| मंगळवार पेठ | ३८.१७ | ४६.२० |
| नागाळा पार्क | ४०.२९ | ४४.२३ |
| ताराबाई पार्क | ४६.८७ | ४७.३० |
| व्यावसायिक | | |
| मिरजकर तिकटी | ५१.७६ | ५४.०१ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ४४.९३ | ५७.०६ |
| महाद्वार रोड | ५४.०५ | ५२.३० |
| गुजरी कॉर्नर | ४३.७९ | ५२.०१ |
| पापाची तिकटी | ५९.६४ | ६०.०२ |
| राजारामपुरी | ५१.०२ | ५२.०३ |
| लक्ष्मीपुरी | ४२.९३ | ५४.०८ |
| शाहूपुरी | ४२.०५ | ५३.०२ |
| गंगावेश | ६०.६९ | ६३.०८ |
| बिंदू चौक | ५२.४० | ५५.१० |
| औद्योगिक | | |
| उद्यमनगर | ४५.१२ | ५६.५० |
| वाय. पी. पोवारनगर | ४३.४५ | ५४.६० |



कोरोनामुळे गतवर्षी अनंत चर्तुदशीदिवशी रस्त्यावर भाविक कमी होते. त्या तुलनेत यंदा भाविकांची गर्दी जास्त राहिली. फटाके, ध्वनिक्षेपकाचाही वापर गतवर्षीपेक्षा अधिक राहिला. त्यामुळे ध्वनी पातळी वाढलेली दिसते.

- प्रा. डॉ. असावरी जाधव, प्रभारी विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग

# कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून सोनाली नवांगुळ यांचा सत्कार

## शिवाजी विद्यापीठात भाषांतरविषयक नव्या प्रकल्पात सहभागी होण्याचे आवाहन



**कोल्हापूर**: साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या लेखिका सोनाली नवांगुळ यांच्या निवासस्थानी जाऊन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचा सत्कार केला.

विद्यापीठ भविष्यात भाषांतराचा एक महत्त्वाचा प्रकल्प राबविण्याचा विचार करत असून यासाठी लेखिका नवांगुळ यांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

नवांगुळ यांनीही शिवाजी विद्यापीठ हे आपले विद्यापीठ असल्याने विद्यापीठाच्या प्रकल्पात सहभागाला नाही म्हणण्याचा प्रश्नच येत नसल्याचे यावेळी स्पष्ट केले.

नवांगुळ यांनी त्यांच्या सवडीने विद्यापीठाच्या वास्तूंना भेट देऊन केलेल्या सोयी पहाव्यात आणि काही त्रुटी असतील तर त्या सांगाव्यात म्हणजे त्याही दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाहीदेखील कुलगुरु डॉ. शिर्के यांनी यावेळी दिली.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यावेळी उपस्थित होते. नवांगुळ यांना पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन त्यांचे विद्यापीठाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

दरम्यान, नवांगुळ यांच्यावर राज्यभरातील मान्यवरांकडून अजूनही अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनीही पुरस्काराची घोषणा होताच तमिळ लेखिका सलमा यांचे आणि मराठी वाचकांना तमिळ लेखिकेच्या साहित्यकृतीची भाषांतराच्या माध्यमातून ओळख करून दिल्याबद्दल सोनाली नवांगुळ यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.